MHAK070002412013

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१३</u>**
**<u>मधील निशाणी क्रमांक ९२ वरील आदेश</u>**
(दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४)

वादी यांनी सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे पुरावा प्रतिज्ञापत्रात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे म्हणणेनुसार, प्रस्तुत दाव्यात वादी चंद्रभान वासुदेव राठोड यांनी निशाणी ८७ वर त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दिले आहे. वादी यांनी दावा परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पुर्व–उत्तर भागावर बांधलेले घर हा दाव्याचा वाद विषय आहे. परंतु त्यांचे पुरावा प्रतिज्ञापत्र तयार करतांना पुरावा प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. २, पान क्र. २, ओळ क्र. ४ मधील ''पुर्व–उत्तर'' या शब्दाऐवजी नजरचुकीने ''पश्चिम–उत्तर' असे टंकलिखित झाले असल्यामुळे सदरची चुक टंकलेखनाच्या दोषामुळे झालेली असुन ते दुरुस्त करणे आवश्यक आहे. ''पश्चिम–उत्तर' हा शब्द काढुन त्याऐवजी ''पुर्व–उत्तर'' पुरावा प्रतिज्ञापत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

**३.** प्रतिवादीने अर्जाला विरोध करुन असा आक्षेप घेतला की, कायदयात संपरिक्षेची सुरुवात झाल्यानंतर दुरुस्तीची कोणतीही तरतुद नमुद नाही. सदरचे प्रकरण २०१४ पासुन प्रलंबित आहे. फक्त प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह खारिज करण्यात यावा.

**४.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार सर्व वादप्रश्न निकाली काढण्यासाठी सुनावणीच्या टप्प्यावर न्यायालय वादकथने दुरुस्त करण्यास परवानगी देऊ शकते. परंतु दाव्याची सुनावणी झाल्यावर दुरुस्ती करावयाची असल्यास अर्जदाराला कोणत्या कारणामुळे त्याला दुरुस्ती करता आली नाही त्याबाबत स्पष्टीकरण द्यावे लागते. ही अविवादीत आहे की, प्रकरणात वादीने निशाणी ८७ अन्वये पुराव्याचे शपथपत्र दि. १९.०४.२०२४ रोजी दाखल केलेले आहे. वादीने पुरावा शपथपत्रात नजरचुकीने 'पुर्व–उत्तर'' या शब्दाऐवजी ''पश्चिम–उत्तर' असे टंकलिखित झाले असल्याने सदर दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेची मागणी केलेली आहे. दिवाणी

प्रक्रिया संहितामध्ये पुरावा शपथपत्रात दुरुस्ती करण्याची कोणतीही तरतुद नमुद केलेली नाही. परंतु दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे न्यायालयास योग्य वाटल्यास न्यायाच्या हिताच्या दृष्टीने आदेश पारित करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. अविवादीतपणे प्रस्तुतचा दावा ताबा आणि निरंतर मनाईहुकूम मिळणेकरिता दाखल करण्यात आलेला आहे. निश्चित प्रकरणात सुनावणीची सुरुवात झालेली आहे. प्रतिवादीने वादीचे अर्जातील कथनाला विरोध केला असला तरी अर्जात वादीने केलेली मागणी/प्रस्तावित दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची आणि टंकलेखनाच्या दोषामुळे झालेली असल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादीने सुचविलेली प्रस्तावित दुरुस्ती करिता वादीला परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चावर मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज रु. ३००/– खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करुन पुढील कार्यवाही करावी.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.11.29 11:33:21 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.

दिनांक : २८/११/२०२४.
ठिकाणः बाळापूर

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 28/11/2024 |
| Order signed by P.O on | :- | 28/11/2024 |
| Order uploaded on | :- | 29/11/2024 |